# KYKM Foundation

"सेवा परमो धर्मः"

7058174130 / 9637496196

info.kykm@gmail.com

www.kykm.weebly.com


दि : ०५/०३/२०२१ जा.क्र : MH/CL/२०२१/०३/०१

प्रति,
के.वाय.के.एम फाऊंडेशनचे
महाराष्ट्र राज्य व्यवस्थापन समिती सदस्य /
कोकण , पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा,
उत्तर महाराष्ट्र व खान्देश, विदर्भ या प्रादेशिक विभागाचे प्रमुख /
सर्व जिल्हाध्यक्ष / जिल्हा महासचिव / तालुका अध्यक्ष / तालुका सचिव यांना,

विषय :- के.वाय.के.एम फाऊंडेशनच्या महाराष्ट्र राज्यातील सर्व स्तरावरील पदाधिकारी यांच्यासाठी नियमावली जाहीर करणेबाबत...!

महोदय/ महोदया,

महाराष्ट्र राज्यातील सर्व स्तरावरील पदाधिकारी यांना कळविण्यात येते की, के.वाय.के.एम फाऊंडेशन महाराष्ट्रातील प्रत्येक तळागाळातील घटकापर्यंत पोहचण्यासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका स्तरावर पदाधिकारी नेमणूक करण्यात आली आहे, ज्यांच्या मार्फत समाजातील शिक्षण, बेरोजगारी, उपासमारी, पर्यावरण, महिला सबलीकरण, युवा सशक्तीकर आदी समस्येवर मात करण्यासाठी तत्पर आहे.

पदाधिकारी यांना दिलेल्या पदावरील कार्यक्षेत्रात काही अधिकार संस्थेच्या वतीने देऊ केले जात आहेत , त्यांचा वापर करून आणि समाजपयोगी निर्णय घेऊन कार्य करावे.

पुढील कार्यासाठी शुभेच्छा.......!

नोंद:- सदर नियमावली ही संस्थेच्या संविधानाप्रमाणे कार्य करते, तिचा आदर करावा व नियमांचे काळजीपूर्वक पालन करावे. तसेच नियमावली संदर्भात काही अडचणी आल्यास संस्थेच्या सचिवांना संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| मोहनिष वाडेकर | दिव्यांनी बोरसे | कल्पेश बोरसे |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव |

# अनुक्रमणिका

| मुख्य घटक | उपघटक |
|---|---|
| के.वाय.के.एम [KYKM] ओळख | ➢ स्थापना आणि नाव<br>➢ ब्रीदवाक्य / बोधवाक्य<br>➢ बोधचिन्ह |
| के.वाय.के.एम [KYKM] प्रस्तावना | |
| के.वाय.के.एम [KYKM] उद्देश | ➢ शैक्षणिक |
| | ➢ महिला व बाल कल्याण |
| | ➢ आरोग्य |
| | ➢ सामाजिक |
| | ➢ ग्रामिण विकास व शेती विषयक |
| | ➢ क्रीडा विषयक |
| के.वाय.के.एम [KYKM] सामान्य नियम | |
| के.वाय.के.एम [KYKM] महाराष्ट्र राज्य पदाधिकारी कार्य / अधिकार / नियम | ➢ महाराष्ट्र राज्य व्यवस्थापन समिती सदस्य<br>➢ प्रादेशिक पुरुष आणि स्त्री विभाग प्रमुख<br>➢ जिल्हाध्यक्ष<br>➢ जिल्हा महासचिव<br>➢ तालुका अध्यक्ष<br>➢ तालुका सचिव |

## ❖ ओळख

### ➢ स्थापना व नाव :-

के.वाय.के.एम [KYKM] फाऊंडेशन या संस्थेची स्थापना ११ जानेवारी २०२१ रोजी करण्यात आली आहे. सदरील स्थापन ही नवनिर्वाचित संस्थापक सदस्यांमार्फत महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्ह्यातील तालुके, खेडे, गाव पातळीवर आदिवासी पाडे इत्यादी ठिकाणी सेवा प्रदान करता यावी या उद्देशाने नव्याने नोंदणी द्वारे कार्यक्षेत्र (भारत देश) वाढवून केली आहे. मात्र संस्थेची प्राथमिक स्थापना ८ मार्च २०१८ असून संस्थेचा वर्धापनदिन / स्थापना दिवस "०८ मार्च (जागतिक महिला दिन)" हा मानण्यात व साजरा करण्यात येतो.

संस्थेचे नाव हे इंग्रजी मधील "K Y K M" आणि मराठीत के.वाय.के.एम फाऊंडेशन असे नोंदणी द्वारे स्थापन झाले आहे.

### ➢ ब्रीदवाक्य / बोधवाक्य :-

के.वाय.के.एम फाऊंडेशनचे बोधवाक्य "सेवा परमो धर्मः" हे आहे. ज्याचा अर्थ समाजाची सेवा करणे हेच आपले धर्म (ईश्वर) सांगते.

### ➢ बोधचिन्ह (LOGO) :-

के.वाय.के.एम फाऊंडेशन च्या बोधचिन्हात निसर्गाच्या चक्रव्यूहात समाजाने सामाजिक हितासाठी स्थापन केलेले "के.वाय.के.एम फाऊंडेशन" सामाजिक बांधिलकी असणाऱ्या हातात कुशल, सुदृढ समाजहितासाठी सदैव तत्पर आहे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

❖ **प्रस्तावना :-**

के.वाय.के.एम फाऊंडेशनच्या नव्याने स्थापन झालेल्या घटनेद्वारे संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य वाढवून संपूर्ण भारत देश केले आहे. त्यानुसार संस्थेचे संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा तेथे के.वाय.के.एम या कल्पनेला सार्थ करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाध्यक्ष, जिल्हा महासचिव तसेच तालुक्यातील तालुका अध्यक्ष, तालुका सचिव या पदावर ना नफा तत्त्वावर पदाधिकारी निवड करण्यात आले आहेत. या पदाधिकारी वर्गाच्या मार्फत के.वाय.के.एम या एका छताखाली एकाच वेळी संपूर्ण महाराष्ट्रात उपक्रम, स्पर्धा, लाईव्ह व्याख्याने , कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण, इत्यादी उपक्रम राबविले जातील अशी अपेक्षा आहे. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांचा पदभार कालावधी पूर्ण झाल्यावर त्यांना संस्थेचे आजीव सदस्यत्व प्राप्त होईल त्यासोबतच संस्थेच्या ज्या पदावर ते योग्य पध्दतीने कार्यभार सांभाळून कालावधी पूर्ण करतील त्यांना अनुभव प्रमाणपत्र व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येईल. ज्याचा उपयोग त्यांना भविष्यात खाजगी किंवा सरकारी क्षेत्रात अनुभवी म्हणून प्राधान्य मिळावे अशी आशा आहे.

केवायकेएम फाउंडेशन हा आपल्या समाजातील सर्व घटकातील युवकांच्या युतीमुळे सुरू झालेला उपक्रम आहे. म्हणूनच, आपल्या समाजाची पुनर्बांधणी करण्यासाठी आणि इच्छित ध्येये साध्य करण्यासाठी पुढे येऊन एकत्र येऊ इच्छिणाऱ्या सर्वांसाठी एक समान व्यासपीठ म्हणून त्याची कल्पना करण्यात आली. भारत हा एक तरुणप्रधान देश आहे, त्यामुळे या देशातील तरुणांमध्ये प्रामुख्याने प्रचंड क्षमता आहे. के.वाय.के.एम [KYKM] समाजात सकारात्मक आणि प्रभावी बदल घडवून आणण्यासाठी आम्ही आपले मनुष्यबळ आणि संसाधने एकत्र करण्याचा प्रयत्न करतो.

के.वाय.के.एम [KYKM] चे मुख्य उद्दीष्ट म्हणजे समाजातील विशेषाधिकारित घटकांना मूलभूत शिक्षण देणे तसेच त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यासाठी आणि आपल्या देशातील निरक्षरतेच्या दुष्टतेचे उच्चाटन करण्यासाठी पुरेसे अभ्यास साहित्य उपलब्ध करणे हे आहे. टीम केवायकेएम शिक्षण, आरोग्यसेवा, पर्यावरण, सांस्कृतिक, महिला सक्षमीकरण आणि आपत्ती प्रतिसाद क्षेत्राला समर्पित विविध प्रकल्पांवर काम करते. केवायकेएम मोहिमांच्या मदतीने विविध सामाजिक प्रश्न आणि विषयांविषयी जागरूकता निर्माण करण्याचे काम करते आणि आपल्या सदस्यांचा आणि स्वयंसेवकांचा आधार असलेले प्रकल्प हाती घेण्याचे काम करते.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com


## ❖ उद्देश :-

**के.वाय.के.एम [KYKM] फाऊंडेशनचे प्राथमिक स्वरूपातील उद्देश खालीलप्रमाणे आहेत.**

### १] शैक्षणिक :-

नर्सरी , आंगणवाडी बालवाडीपासून ते उच्च महाविद्यालयापर्यंत सर्व शाखेतील मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करणे . प्राथमिक माध्यमिक शाळा महाविद्यालये सुरु करणे , केजी टु पीजी शिक्षण उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न करणे , सर्व शाखेतील वैदयकीय महाविद्यालय , आर्टस , कॉमर्स विज्ञान महाविद्यालय , पशुवैद्यकीय महाविद्यालय , मुला मुलीसाठी स्वतंत्र वसतिगृह , वस्तीशाळा , संगणक प्रशिक्षण देणे , बालकामगारांसाठी शाळा चालविणे , व्यायामशाळा सुरु करणे , वाचनालय व ग्रंथालय सुरु करणे . मुकबधिर , मतिमंद , कर्णबधिर , अस्थिव्यंग , अंध या अपंग प्रवर्गातील विद्यार्थ्यासाठी निवासी शाळा सुरु करुन त्याचा सर्वांगीण विकास साधणे त्यांना मुख्य प्रवाहात आणुन त्यांचे जीवनमान सुधारण्यासाठी प्रयत्न करणे , नर्सिंगचे प्रशिक्षण देण्याची सोय करणे , योग विद्येचा प्रचार करणे , शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रशासकीय सेवेत कल वाढावा यासाठी मार्गदर्शन व्याख्यानाचे तज्ञांमार्फत आयोजन करणे , समाजातील शिक्षणापासुन वंचित असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्वोतोपरी मदत करणे.

### २] महिला व बाल कल्याण :-

महिलांना स्वावलंबना करिता मार्गदर्शन करणे , गरजु , गरीब , निराधार , बेघर , घटस्फोटीता , विधवा , परितक्ता , इत्यादी गटातील महिलांचे पुनवर्सन करण्यासाठी प्रयत्न करणे . महिला व बालविकासासाठी धर्मादाय स्वरुपाचे कार्य करून समाजातील महिला व बालकाचा विकास करणे , बालकांसाठी बालकाश्रम , निरिक्षणगृह , बालगृहे , बालसंगोपन , भिक्षेकरी मुलांसाठी योजना , कृपोषण मुक्ती साठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

३] आरोग्य :-

आरोग्यम धनसंपदा हे संस्थेचे प्राथमिक उद्देश राहील , वैद्यकीय (शासकीय) सेवसुविधांची माहिती सामान्य जनतेपर्यंत पोहचविणे . त्यांना वैद्यकीय सुविधा पुरविणे . ग्रामीण रुग्णालय, धर्मार्थ दवाखाने सुरु करणे, फिरते रुग्णालय सुरु करणे , महिला व पालक आरोग्य तपासणी शिबिरे भरविणे , रक्तदान शिबीर आयोजित करणे , रुग्णवाहिका , शववाहिनी , रक्तपेढीची सोय करणे , किडनी व कॅन्सर या आजारासाठी अत्यंत गरीब रुगणांना, दारिद्र्यरेषेखालील रुग्णांना मदत करणे . धर्मादाय आयुर्वेदिक हॉस्पीटल सुरु करणे . नेत्रपेढी सुरु करणे . अवयव दानाचे महत्व पटवुन देण्यासाठी जनजागृती शिबिराचे आयोजन करणे. व्यसनमुक्त समाज घडविण्यासाठी प्रयत्न करणे . व त्या माध्यमातुन व्यसन ग्रस्तांच्यापुनर्वसनासाठी कार्यक्रम घेणे . दुर्धर आजार असलेल्या रुग्णांना सर्वोतोपरी मदत करणे.

४] सामाजिक :-

भारतीय प्राचीन संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने तसेच भारतीय संस्कृती भावीपिडीत रुजविण्याकरिता संस्कृतीदर्शक कार्यक्रमाचे आयोजन करणे . सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्रोत्सव धर्मादाय प्रकारचे सर्व धर्माचे उत्सव साजरे करणे. नैसर्गिक आपत्तीग्रस्त , भुंकपग्रस्त यांना सर्वतोपरीने मदत करणे व त्यांचे पुनर्वसन करणे . वृध्दाश्रम , विधवा मनोविकलांग वृध्दांसाठी कार्य करणे . व्यक्ती विकास शिबिरे आयोजित करणे . वृक्षसंवर्धानाबाबत मार्गदर्शन करणे .

५] ग्रामिण विकास व शेती विषयक :-

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती विषयक आधुनिक तंत्रज्ञानाची नवीन माहिती देणे . जलसंवर्धनाचे कार्य करणे . पाणी आडवा पाणी जिरवा मोहीम सुरु करणे . ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना व बेरोजगारांना रोजगार व स्वयंरोजगाराबाबत माहिती देणे . सेंद्रिय शेतीस चालना देण्यासाठी प्रयत्न करणे गोशाळा सुरु करुन भटक्या जनावराचे पालन पोषण करणे . सामुहिक शेती पध्दती सुरु करणे. शेतकऱ्यांना मदत करून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत करणे.

7058174130 / 9637496196

info.kykm@gmail.com

www.kykm.weebly.com


## ६] क्रीडा विषयक :-

क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे . राष्ट्रीय व राज्यस्तरीय क्रीडापटू तयार करणे. खेळाडूंना क्रीडा साहित्य उपलब्ध करून देणे . खेळाडुना वाव देण्यासाठी क्रिडा स्पर्धांचे आयोजन करणे क्रीडा विषयक आदिवासी व ग्रामीण भागामधील लोकांमध्ये रुची निर्माण करणे . उत्कृष्ट खेळाडूंना सर्वोतोपरी मदत करणे.

## ❖ संस्थेचे सामान्य नियम

१) संस्थेचा कोणत्याही राजकीय घटकांशी सबंध नाही, अथवा संस्थेचा पदाधिकारी कोणत्याही राजकीय पदावर नसावा.

२) संस्थेचे कामकाज संस्थापक तथा संचालक समिती यांच्यामार्फत दिलेल्या नियमानुसार चालेल.

३) पदावर निवडलेला उमेदवार कोणत्याही पक्षाशी सबंध / जातिभेद / उच्च श्रेष्ठ विचार धारणा असणारा नसावा .

४) के.वाय.के.एम फाऊंडेशन ही संस्था समाजहित साध्य करण्यासाठी आणि देशाचे सुजाण नागरिक घडविण्यासाठी स्थापन करण्यात आलेली आहे.

५) या संस्थेत सर्वधर्मसमभाव कायम वास करत राहिल .

६) संस्था महिला , बालकल्याण , तृतीयपंथी , दुर्बल घटक यांच्या करिता स्वतंत्ररीत्या काम करण्यास परवानगी देते.

७) संस्था हि बहुउदेशीय सामाजिक उद्देशाने स्थापन झाली असून , सामाजिक हितासाठी कार्यरत आहे.

7058174130 / 9637496196

info.kykm@gmail.com

www.kykm.weebly.com


८) या संस्थेमध्ये कोणत्याही नागरिकाविरुद्ध तथा संस्थेतील सदस्यांविरुद्ध कोणत्याही प्रकारचे गैरकृत्य होणार नाही याची खबरदारी बाळगली जाईल .

९) संस्थेच्या पदाधिकाऱ्यांमार्फत संस्थेच्या नावाचा, प्रतीक चिन्हांचा, बोधवाक्य यांचा अयोग्य कामासाठी गैरवापर झाल्यास अश्या पदाधिकाऱ्यास कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय पदावरून बरखास्त करण्यात येईल.

१०) नियमांत बदल सुचवायचा असल्यास किंवा नियमबाबत काही हरकत असल्यास रजिस्टर समितीशी संपर्क करावा . जेणेकरून योग्य बदल सुचविले असतील तर संचालक समिती बदल अंमलात आणले.

११) गरज भासल्यास संचालक समिती नियमांमध्ये बदल करू शकते किंवा नविन नियमांची अंमलबजावणी करेल.

११) पदावर असतांना केलेल्या कार्याची योग्यप्रकारे दखल घेऊन पदोन्नती करण्यात येईल यासाठी संचालक समितीकडे वेळोवेळी कार्याचा आढावा सादर करावा.

१२) संस्थेच्या कोणत्याही पदावर असणाऱ्या व्यक्तीबद्दल कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास संस्थेचे अध्यक्ष तथा सचिव यांना संपर्क साधावा.

१३) तळागाळातील दुर्बळ घटकापर्यंत पोहचण्यासाठी सदैव प्रयत्न करावेत, त्यासाठी संस्थेची मदत लागल्यास सविस्तर माहिती आणि मदतीचे स्वरूप जिल्हाध्यक्ष, प्रादेशिक विभाग प्रमुख, यांच्या मार्फत संस्थेला कळवावे.

१४) संस्थेच्या वतीने मिळणाऱ्या सूचना, नोटीस, इत्यादी माहिती www.kykm.weebly.com या संस्थेच्या वेबसाईटवर मिळतील.

१४) संस्थेचा नियमावली संदर्भात काही तक्रार किंवा अडचणी आल्यास संस्थेचे सचिव यांना संपर्क साधावा.

KYKM
Foundation

"सेवा परमो धर्मः"

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

## ❖संस्थेची महाराष्ट्र राज्य पदाधिकारी कार्यकारणी व कार्य

➢ **पद : महाराष्ट्र राज्य व्यवस्थापन समिती सदस्य**

- **कार्यकाळ : पदभार स्वीकृती पासून ३ वर्षे**

१) राज्य व्यवस्थापन समिती मध्ये पाच (५) सदस्य आहेत .

२) राज्य व्यवस्थापन समिती सदस्य यांची निवड संचालक समिती सदस्य करतील.

३) प्रादेशिक विभाग लक्षात घेता महाराष्ट्रातील पुढील पाच प्रादेशिक विभागासाठी प्रत्येकी एक सदस्य निवड करण्यात येईल.

- ✓ कोकण - पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई, रायगड, रत्नागिरी,सिंधुदुर्ग
- ✓ उत्तर महाराष्ट्र व खान्देश - नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, अहमदनगर
- ✓ पश्चिम महाराष्ट्र - पुणे, सातारा, सोलापूर, सांगली, कोल्हापूर
- ✓ मराठवाडा - औरंगाबाद, जालना, बीड, परभणी, उस्मानाबाद, नांदेड, लातूर,
- ✓ विदर्भ - अमरावती, बुलढाणा, वाशीम, अकोला, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली, नागपूर, वर्धा

४) व्यवस्थापन समिती सदस्यांचे प्रमुख कार्य आपल्या प्रादेशिक विभागामध्ये नियंत्रण ठेवणे, विभागातील उपक्रमाबाबत नियमितपणे आढावा घेणे, त्यांना उपक्रम / कार्यक्रम बाबतीत पूर्णपणे सूचना व कल्पना देऊन मार्गदर्शन करणे.

५) विभागातील पुरुष व स्त्री विभाग प्रमुख, जिल्हाध्यक्ष, जिल्हा महासचिव, तालुका अध्यक्ष, तालुका सचिव या पदांवरील पदाधिकारी नियुक्ती साठी संस्थेला प्रस्ताव सादर करणे.

६) प्रादेशिक विभागात होणाऱ्या कार्यक्रमांची नोंद प्रादेशिक विभाग प्रमुख यांच्याकडून दर तीन महिन्यांमध्ये घेणे.

७) दर एका महिन्यात प्रादेशिक विभाग प्रमुख , जिल्हाध्यक्ष, जिल्हा महासचिव, तसेच तालुका अध्यक्ष व तालुका सचिव यांची मिटिंग घेऊन पुढील काळातील नियोजनाबाबत चर्चा करणे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

८) संचालक समितीकडून वेळोवेळी मिळणाऱ्या सुचनांचे पालन करणे, तथा वेळोवेळी प्रादेशिक विभाग उत्तम कामगिरी करण्यासाठी मार्गदर्शन करणे.

➢ **पद : प्रादेशिक पुरुष आणि स्त्री विभाग प्रमुख**

- **कार्यकाळ : - पदभार स्वीकृती पासून २ वर्षे**

१) विभागात येणाऱ्या सर्व जिल्ह्यातील प्रमुख म्हणून कार्यरत राहणे.

२) विभागात पुरुष व स्त्री असे प्रत्येकी २ विभाग प्रमुख हे पद उपलब्ध आहे.

३) प्रादेशिक विभागात होणाऱ्या कार्यक्रमांची नोंद जिल्हाध्यक्ष यांच्याकडून दर तीन महिन्यांमध्ये घेणे.

४) जिल्हाध्यक्ष यांना कार्यक्रम किंवा उपक्रम घेण्यासाठी परवानगी देणे हे प्रमुख कार्य.

५) जिल्ह्यातील कार्यक्रमासाठी / उपक्रमासाठी लेटरपॅड हे संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. आपणास ईमेलद्वारे ID व PASSWORD देण्यात येईल त्याद्वारे आपण ते DOWNLOAD करून जिल्हाध्यक्ष यांना कार्यक्रम पूर्व देणे.

६) दर एका महिन्यात प्रादेशिक विभागातील जिल्हाध्यक्ष, जिल्हा महासचिव, तसेच तालुका अध्यक्ष व तालुका सचिव यांची मिटिंग घेऊन पुढील काळातील नियोजनाबाबत चर्चा करणे.

७) संचालक समितीकडून मिळणाऱ्या सुचनांचे पालन करणे तथा वेळोवेळी सूचना जिल्ह्यातील पदाधिकारींना देणे.

7058174130 / 9637496196

info.kykm@gmail.com

www.kykm.weebly.com


## ➢ पद : जिल्हाध्यक्ष

- **कार्यकाळ :- पदभार स्वीकृती पासून ३ वर्ष**

१) जिल्ह्यातील प्रमुख म्हणून कार्यरत राहणे.

२) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तालुका अध्यक्ष व तालुका सचिव यांची कार्यकारिणी कार्यरत असेल.

३) विभाग प्रमुख यांच्या पूर्व परवानगीनुसार जिल्ह्यातील कार्यक्रम / उपक्रमाचे नियोजन तथा आयोजन करणे.

४) संपूर्ण जिल्हा हद्दीतील कार्यक्रमांसाठी जिल्हा महासचिव तथा तालुक्यातील अध्यक्ष आणि तालुका सचिव यांच्या सोबत मीटिंग घेऊन पूर्व नियोजन करणे.

५) संपूर्ण जिल्ह्यासाठी महत्वपूर्ण निर्णय घेवायचा असल्यास जिल्हा महासचिव यांच्या सोबत विचारविनिमय करणे बंधनकारक आहे.

६) दर एका महिन्यात तालुका अध्यक्ष आणि तालुका सचिव यांची मिटिंग घेऊन पुढील काळातील नियोजनाबाबत चर्चा करणे.

७) जिल्ह्यातील मिटिंगचे अध्यक्ष स्थान भूषवणे

८) कार्यक्रम / उपक्रम आयोजित करण्यासाठी "लेटरपॅड" प्रादेशिक विभाग प्रमुख यांच्याकडून मिळेल.

९) जिल्ह्यातील कार्याचा आढावा दर ३ महिन्यात जिल्हाध्यक्ष सविस्तर स्वरूपात प्रादेशिक विभाग प्रमुख यांना देतील.

१०) कार्यक्रमांची / उपक्रमांची नोंद कार्यक्रम झाल्यानंतर १ आठवड्यात संस्थेला "ऑनलाईन फॉर्म" भरून सादर करतील.

११) समितीकडून मिळणाऱ्या सुचनांचे पालन करणे तथा वेळोवेळी सूचना जिल्ह्यातील आणि तालुक्यातील पदाधिकारिंना देणे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

- **पद : जिल्हा महासचिव**
- **कार्यकाळ :- पदभार स्वीकृती पासून ३ वर्ष**

१) सर्व कामकाज महासचिव यांच्या विचारविनिमय व चर्चेद्वारे करण्यात येईल.

२) जिल्ह्यातील सर्व कार्यक्रम तथा उपक्रम यांची पेपरन्युज, फोटो, कागदपत्रे, पत्रव्यवहार इत्यादी नोंद जिल्हा महासचिव यांच्याकडे राहील.

३) जिल्हाध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत जिल्ह्यातील सर्व कामकाज पाहणे तथा मिटिंगचे अध्यक्ष स्थान भूषवावे.

४) दर एका महिन्यात तालुका अध्यक्ष आणि तालुका सचिव यांच्या मिटिंगचे आयोजन करणे.

५) जिल्ह्यातील पत्रव्यवहार आणि इतर व्यवहार महासचिव जिल्हाध्यक्ष यांच्या परवानगीने करतील.

६) संचालक समितीकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करणे तथा अद्यावत माहिती तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना सूचना देण्यासाठी जिल्हाध्यक्ष यांना सहकार्य करणे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

- **पद : तालुका अध्यक्ष**
- **कार्यकाळ : - २ वर्षे कार्य**

१) हे तळागाळातील समाजापर्यंत पोहचणारे महत्वाचे पद आहे.

२) तालुका अध्यक्ष यांनी गाव पातळीवर आपल्या पंचक्रोशीतील सहकारी मिळून टीम तयार करणे.

३) वेळोवेळी टीम च्या माध्यमातून गाव पातळीवर, आदिवासी पाड्यावर, भेट देऊन तेथील समाजासाठी प्रबोधनात्मक प्रयत्न करणे.

४) कार्यक्रम / उपक्रम आयोजित करण्यासाठी जिल्हाध्यक्ष यांना पूर्व कल्पना देणे.

५) कार्यक्रम आयोजनासाठी लेटरपॅड जिल्हाध्यक्ष यांच्या मदतीने विभाग प्रमुख यांच्या कडूनन प्राप्त होईल.

६) गावपातळीवर मोहीम राबविण्यासाठी पूर्व तयारी आणि नियोजन जिल्ह्यातील मीटिंग मध्ये करावे.

७) तळागाळातील तरुण, महिला, बालक, आदी समाजापर्यंत के.वाय.के.एम फाऊंडेशनचे उद्देश पोहचवणे.

८) गावातील राष्ट्रीय सेवा योजना(NSS), राष्ट्रीय छात्र सेना(NCC),स्काऊट गाईड, गावातील भजनी मंडळ, इत्यादी घटकांच्या साहाय्याने संस्थेची उद्देश पूर्ण करण्यासाठी योजना आखणे.

९) तालुक्यातील सर्व महत्वाचे निर्णय घेतांना तालुका सचिव यांच्या सोबत चर्चा करणे बंधनकारक.

१०) कार्याचा आढावा दर ३ महिन्यात जिल्हाध्यक्ष यांना सविस्तर स्वरूपात द्यावा.

११) समितीकडून मिळणाऱ्या सुचनांचे पालन करणे.

7058174130 / 9637496196

info.kykm@gmail.com

www.kykm.weebly.com


- **पद : तालुका सचिव**

- **कार्यकाळ : - २ वर्षे कार्य**

१) अध्यक्ष यांच्या अनुपस्थितीत सर्व कामकाज सचिव पाहतील.

२) तालुक्यातील सर्व कामकाज तालुका सचिव यांच्या विचारविनिमय व चर्चेद्वारे करण्यात येईल.

३) तालुक्यातील सर्व कार्यक्रम तथा उपक्रम यांची पेपरन्युज, फोटो, कागदपत्रे, पत्रव्यवहार इत्यादी नोंद जिल्हा महासचिव यांच्याकडे वेळोवेळी सुपूर्त करणे.

४) दर ५० दिवसांनी तालुक्यातील पुढील कार्याची रूपरेषा ठरविण्यासाठी मिटिंगचे आयोजन करणे.

५) तालुक्यातील पत्रव्यवहार आणि इतर व्यवहार तालुका सचिव जिल्हाध्यक्ष यांच्या परवानगीने करतील.

६) तालुका अध्यक्ष यांना गावपातळीवर योजना आखणी तथा कार्यक्रम / उपक्रम नियोजन आणि आयोजन करण्यासाठी सहकार्य करणे.

७) संचालक समितीकडून मिळणाऱ्या सूचनांचे पालन करणे.

KYKM FOUNDATION सेवा परमो धर्मः

वरील नियमावली काळजीपूर्वक वाचून , समजून घेऊन आपले अधिकार योग्य समाजहितासाठी वापरावे तथा नियमांचे पालन करावे.

7058174130 / 9637496196
info.kykm@gmail.com
www.kykm.weebly.com

# के.वाय.के.एम फाऊंडेशन
# बोधचिन्ह [LOGO]

**सेवा परमो धर्मः**

**Seva Paramo Dharma:**

**सेवा परमो धर्मः**